## Pimpri Chinchwad Police Commissionerate

# प्रेस नोट ता.०३/११/२०२०

## महागड्या चारचाकी गाड्या चोरी करणाऱ्या आंतराज्यीय टोळीचा पर्दाफाश, १३ चारचाकी गाड्या हस्तगत,

## पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची कारवाई

दि.२६/०१/२०२० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सपोनि गणेश पाटील व स्टाफ यांना मिळालेल्या गोपनिय माहितीवरून रावेत येथील एका गॅरेजवर छापा टाकुन चारचाकी गाड्या, गाड्यांचे सुट्टे पार्ट व अनेक इंजिन मिळुन आले होते. मिळुन आलेल्या गाड्यावर महाराष्ट्र पासिंगचा नंबर होता परंतु त्यांचे इंजिन व चेसिस नंबरवरून खात्री करता सदरच्या गाड्या या पंजाब राज्यातील असल्याची निष्पन्न झाले. तसेच काही गाडीवरही असलेला नंबर खोटा असल्याचे आढळुन आले होते. सदर वेळी आरोपी **चनप्रित हरविंदरपाल सिंह, वय ४३ वर्षे, रा. एस.बी. पाटील रोड, रावेत, पुणे** यास ताब्यात घेऊन सदरच्या गाड्या त्याने व त्याचे साथीदार यांनी चोरून आणुन त्यांचे चेसीस व इंजिन नंबरमध्ये फेरफार केल्याचे उघड झाल्याने त्यांचे विरूध्द **देहुरोड पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. ४७/२०२० भादवि कलम ३७९,४११,४१३, ४२०,४६५,४६७,४६८,४७१,४८३,४८६,४८७,३४** अन्वये गुन्हा दाखल करून त्यास गुन्ह्यात अटक करून गुन्ह्याचे तपासामध्ये आरोपी चनप्रित सिंह याचेकडून **इनोव्हा, फोर्च्युनर सारख्या महागड्या एकुण चारचाकी १२ गाड्या तसेच चारचाकी गाड्यांचे १५ इंजिन** असा **२ कोटी १९ लाख रूपयाचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. आरोपीकडुन त्यावेळी दिल्ली, पंजाब, हरीयाणा व चंदीगड राज्यातील **एकुण ९ चारचाकी** वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले होते. सदर **घटनेनंतर आरोपीचा साथीदार मनजित मारवा हा दिल्ली येथे पसार झाला होता.** तेव्हा पासुन गुन्हे शाखा, युनिट १ चे पथक त्याचे मागावर होते.

दि.२४/१०/२०२० रोजी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ कडील सपोनि गणेश पाटील व स्टाफ असे युनिट १ कार्यालय येथे हजर असताना सपोनि गणेश पाटील व पो.शि.सचिन मोरे यांना माहिती मिळाली की, वरील गुन्हयामध्ये पाहीजे असलेला आरोपी मनजित मारवा हा त्याचा साथीदार असे दोघेजन दिल्ली येथुन इनोव्हा व क्रेटा अशा चोरीच्या गाड्या घेवुन मुंबई पुण्याचे दिशेने येत आहेत. वगैरे मजकुरची माहिती मिळताच सपोनि गणेश पाटील यांनी स्टाफच्या वेगवेगळ्या टिम तयार करून टिमला योग्य त्या सुचना देवुन मोशी, खेड, सुपा या टोलनाक्यावर सापळा लावुन दोन दिवस व एक रात्र थांबले असताना मोशी टोलनाका येथे बातमीतील नमुद वर्णनाची इनोवा व क्रेटा या दोन संशयीत गाड्या चाकण कडुन मोशी टोलनाक्या जवळ येत असताना दिसल्या गाडीतील आरोपी यांना टोलनाक्यावरील असलेली गर्दी पाहुन पोलीसांचा संशय आल्याने त्यांनी दोन्ही गाड्या वळवुन पुन्हा नाशिक रोडने जावु लागले त्यांचा सुमारे ३० किलो मिटर पाठलाग करून दोन्ही गाड्या आडवुन त्यामध्ये असलेले **१) मनजित जोगिंदरसिंग मारवा वय रा. वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे मुळ पत्ता - नवी दिल्ली,** तसेच त्याचा साथीदार **२) दिपक चमनलाल खन्ना, वय ४० वर्षे, रा. नवी दिल्ली** यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यात असलेल्या इनोव्हा व क्रेटा गाड्या बाबत चौकशी

करता दोन्ही गाड्या या त्यांनी दिल्ली येथुन चोरल्या असल्याचे निष्पन्न झाले. त्यांना वरील नमुद गुन्ह्यामध्ये अटक करून त्यांची **दि.४/११/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी** घेण्यात आली आहे.

तपासा दरम्यान आरोपी यांच्याकडू **एकुण १३ महागड्या चारचाकी गाड्या त्यामध्ये इनोव्हा ४, व फोर्च्युनर, मारूती इर्टिगा, मारूती स्वीफ्ट, होन्डा सिटी, टोयटा इटॉस, आल्टो कार, निसान टेरेनो, क्रेटा, महिंद्रा बोलेरो कॅम्पर प्रत्येकी १** असा **कि.रू. १ कोटी ३९ लाख रूपयांचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच आरोपी यांना गाड्या विक्री करण्यासाठी मदत करणारे **१) प्रतिक ऊर्फ नागेश छगन देशमुख वय-२८ वर्षे, रा. खोपोली, जि.रायगड २) हारूण शरीफ शेख, वय ३९ वर्षे, रा.चिखली, पुणे** यांना देखील गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली आहे. जप्त गाड्या बाबत खालील प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे.

१) लुधीयाना सराभानगर पो.स्टे. गु.रजि.नं. १९५/२०२० भादवि कलम ३७९, **(इनोव्हा)**
२) दिल्ली, प्रशांत विहार पो.स्टे. गु.रजि.नं. २५३९७/२०२० भादवि कलम ३७९ **(क्रेटा)**
३) पंचकुला, चांदीमंदिर पो.स्टे.गु.रजि.नं. ३६६/२०२० भादवि कलम ३७९ **(इनोव्हा क्रेस्टा)**
४) चंदीगड, सेक्टर ३६ पोलीस ठाणे, गु.रजि.नं. १७७/२०२० भादवि कलम ३७९ **(फोर्च्युनर)**
५) लुधीयाना, पंजाब, डिवीजन ५ पो.स्टे. गु.रजि.नं. २८८/२०२० भादवि कलम ३७९ **(इनोव्हा)**
६) हरीयाण, पाणीपत, चांदणीबाग पो.स्टे, गु.रजि.नं. ४४८/२०२० भादवि कलम ३७९ **(अल्टो)**
७) हरीयाणा, कुरूक्षेत्र, ठाणेसर पो.स्टे.गु.रजि.नं.७३३/२०२० भादवि कलम ३७९ **(बोलेरो कॅम्पर)**

आरोपी मनजित मारवा यांने फरार कालावधीमध्ये कोढंवा भागातध्ये नविन गोडाऊन भाड्याने घेवुन त्यामध्ये गॅरेज चालु करण्याचे तयारीत होता. आरोपी मनजित मारवा हा इन्शुरंन्स कंपनीकडुन ॲक्सीडेंट मध्ये नुकसान झालेल्या चारचाकी गाड्या कागदपत्रासह विकत घेवुन विकत घेतलेल्या गाड्यांच्या त्याच मॉडेलची व रंगाची चारचाकी गाडी पंजाब, हरीयाणा, चंदीगड तसेच दिल्ली या राज्यातुन आरोपी दिपक खन्ना चोरी करून आणुन मनजित मारवा यांस देत असे त्यानंतर त्यागाडीवर ॲक्सीडेंन्ट झालेल्या गाडीचा चेसीस व इंजिन नंबर असलेला भाग लावुन गाडीची पुन्हा विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी मनजित मारवा व दिपक खन्ना हे सराईत गुन्हेगार असुन आरोपी **मनजित मारवा याचे विरूध्द या सारखे दिल्ली, हरीयाणा येथे एकुण १२ गुन्हे** दाखल आहेत. तसेच आरोपी **दिपक खन्ना याचे विरूध्द दिल्ली, हरीयाणा, पंजाब या ठिकाणी ३८ गुन्हे** दाखल आहे

**दाखल गुन्ह्यामध्ये आरोपी यांचेकडुन आता पर्यंत एकुण २५ महागड्या चारचाकी गाड्या व चारचाकी गाड्याचे १५ इंजिन असा एकुण ३ कोटी ५८ लाख रूपायांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सर्व गाड्या या दिल्ली, पंजाब, हरीयाणा, चंदीगड या राज्यातुन चोरून आणल्याचे निष्पन्न झाले आहे. वरील गाड्यापैकी एकुण १६ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.**

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री सुधिर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, परि १ श्री आनंद भोईटे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.आर.आर.पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहायक पोलीस निरीक्षक गणेश पाटील, पोलीस उप निरीक्षक काळुराम लांडगे, तसेच युनिट कडील कर्मचारी सुभाष सावंत, रविंद्र गावंडे, प्रमोद लांडे, अमित गायकवाड, बाळु कोकाटे, मनोजकुमार कमले, सोमनाथ बोऱ्हाडे, महादेव जावळे, मारूती जायभाये, सचिन मोरे, प्रमोद गर्जे, सुनिल चौधरी, प्रमोद हिरळकार, अंजनराव सोडगिर, आनंद बनसोडे, नागेश माळी याचे पथकाने केली आहे.

गुन्ह्याचा अधिक तपास सपोनि गणेश पाटील, गुन्हे शाखा, युनिट १, पिंपरी चिंचवड हे करीत आहेत.




PIMPRI-CHINCHWAD POLICE
पिंपरी-चिंचवड पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय